विवा महाविद्यालयात पार पडला पदवी वितरण सोहळा

एकंदर १११ विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली पदवी

ज्या महाविद्यालयात आपण शिकलो, तिथल्या विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल अशा विचारांची देणगी महाविद्यालयाला द्या. नोकरीच्या निमित्ताने आता तुम्ही जगात फिराल अशावेळी आपल्या महाविद्यालयाच्या दृष्टीने महत्त्वाच्या नवीन गोष्टी दिसल्या तर त्या आवर्जून आमच्यापर्यंत पोहोचवा. त्यावर आपण नक्कीच विचार करू असं आश्वासन वसई विरार महानगरपालिकेच्या महापौर सौ प्रवीणा ठाकूर यांनी पदवी वितरण समारंभात दिले. विवा महाविद्यालयाच्या विविध अभ्यासक्रमांच्या यशस्वी प्रथम तीन क्रमांकाच्या पदवीधरांना पदवी प्रदान करण्याचा कार्यक्रम शनिवारी १८ फेब्रुवारी २०१७ रोजी पार पडला.  या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रवीणा ठाकूर उपस्थित होत्या.

आज तुम्ही शैक्षणिकदृष्टया यशवंत झालात, असेच यश पुढच्या आयुष्यातही मिळवा. त्यासाठी Network पेक्षाही Net worth असणं महत्त्वाचे आहे, असा सल्ला आमदार क्षितीज ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना दिला. अनुभव म्हणून नोकरी करा पण स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याचा विचार करा. व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवलापेक्षाही हटके कल्पनांची गरज असल्याचं त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. तर वसई विरार महानगरपालिकेचे प्रथम महापौर राजीव पाटील यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षणाचा स्वतःला, कुटुंबाला तसेच आपल्या परिसरातील इतरांनाही काय फायदा होईल याचा विचार करा. आजच्या स्मार्ट पिढीकडून आम्हाला बऱ्याच अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

या पदवी वितरण सोहळ्यात महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य संजीव पाटील, संजय पिंगुळकर, श्रीनिवास पाध्ये, प्राचार्य डॉ. रविकिरण भगत, समन्वयक नारायणन् कुट्टी, उपप्राचार्या प्राजक्ता परांजपे यांच्या हस्ते पदवी परीक्षेतील ६२ तर पदव्युत्तर परीक्षेतील ४९ अशा १११ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती वंदना आणि विद्यापीठ गीताने करण्यात आली. त्यानंतर प्राचार्य डॉ. रविकिरण भगत यांनी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल सादर केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभारप्रदर्शन उपप्राचार्या प्राजक्ता परांजपे तर सूत्रसंचालन हर्षवर्धिनी बोरवणकर यांनी केले.  या कार्यक्रमासाठी यशवंत विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच शिक्षक उपस्थित होते.

डॉ. रविकिरण भगत

प्राचार्य, विवा महाविद्यालय

यांच्या कार्यालयातून